**नियमित फौजदारी खटला क्र. ६०/२०१७ मध्ये नि.क्र. ६९ वरील आदेश**

सदरचा अर्ज हा आरोपी क्र. ३ हिरामण बागुल याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ अन्वये त्याला विनादोषारोप मुक्त करण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदाराचे म्हणणे की, फौ.प्र.सं कलम १७३ अन्वये दाखल केलेला अहवाल व त्या सोबतची कागदपत्रे तपासली असता, आरोपी क्र. १ व २ यांचा गुन्हयात सहभाग दिसुन येतो. आरोपी क्र. ३ याचा गुन्हयाशी कोणताही संबंध नाही. आरोपी क्र. १ ला फिर्यादीने रू. दोन लाख रोख दिले व इतर रू. दोन लाख फिर्यादीने आरोपी क्र. २ च्या खात्यातभरले. सदर रक्कमेचा संबंध हा आरोपी क्र. १ व २ यांच्याशी असुन घटनेशी आरोपी क्र. ३ चा संबंध नाही. आरोपी क्र. ३ हा नाशिक महानगरपालीकेत शिक्षण विभागात शिक्षक म्हणुन २४ वर्षापासुन काम करतो. तसेच, तो नाशिक येथे राहतो. घटना ही वणी व नांदुरी येथे घडली. त्या घटनेशी आरोपीचा काही संबंध नाही. फिर्यादीतर्फे आरोपी व नंदकुमार पगार याना कायदेशीर नोटीस पाठविली. त्या नोटीसवरून आरोपी क्र. ३ चा घटनेशी काहीएक संबंध नाही हे स्पष्ट होते. वरील कारणांवरून आरोपी क्र. ३ याने त्याला गुन्हयामधुन विनादोषारोप मुक्त करावे अशी विनंती केली.

०२. माझे पुर्वाधिकारी यांनी तपासाधिकारी व सरकारी वकील यांचे म्हणणे मागविले. घटनेचा तपास पुर्ण झाल्यामुळे तपासाधिकारी यांचे म्हणणे विचारात न घेता सदरचा अर्ज हा निकाली काढता येतो. आजपर्यंत तपासाधिकारी यांनीत्यांचे म्हणणे दाखल केले नाही. सरकारी वकीलांनी नि.क्र. ७१ द्वारे त्यांचे म्हणणे दिले आहे. सरकारी वकीलांच्या म्हणणेनुसार आरोपी क्र. ३ विरूध्द दोषारोप मांडण्याइतका पुरावा आहे. तसेच, फिर्यादीचा भाउ याने आरोपी क्र. ३ सोबत फोनवर बोलणे केले आहे. तसेच, आरोपी क्र. ३ ने इतर आरोपींसोबत फिर्यादीची ओळख करून दिली. त्यामुळे सरकारी वकीलांनी आरोपी क्र. ३ चा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

०३. आरोपीचे वि.वकील व वि. सरकारी वकीलांचा युक्तिवाद

ऐकला. फौ.प्र.सं.कलम १७३ अन्वये दाखल केलेला अहवाल व त्यासोबतचे कागदपत्रे याचे अवलोकन केले. आरोपीचा अर्ज व सरकारी वकीलांचे म्हणणे याचे अवलोकन केले.

०४. फिर्यादचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वामन महाले हा फिर्यादीचा मित्र आहे व त्याच्याकडुन फिर्यादी व आरोपी क्र. ३ हिरामण बागुल यांची ओळख झाली. फिर्यादीचा भाउ नरेंद्र यानेही आरोपी क्र. ३ हिरामण याने त्याला जालना वखार महामंडळ येथे लिपीकाच्या जागेसाठी नोकरीला लावण्यासाठी रू. चार ते पाच लाख लागतील असे सांगितले. त्यानंतर सायंकाळी ०४.०० वाजता आरोपी हिरामण हा फिर्यादी, त्याचे वडिल, भाउ व मामा यांना भेटला व त्याच्याकडुन फिर्यादीच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती घेतल्या. त्यानंतर १९/०१/२०१४ रोजी फिर्यादी हा लग्नासाठी कळवणला आला होता, त्यावेळी हिरामण, संदिप व ज्ञानेश्वर हे तिघे त्याला भेटले. त्यावेळी त्यांना फिर्यादीने रू. दोन लाख दिले व उर्वरीत रू. दोन लोख फिर्यादीने दिनांक २०/०१/२०१४ रोजी संतोषच्या खात्यावर जमा केले.

०५. फिर्यादप्रमाणे फिर्यादीचा भाउ नरेंद्र व वडिल अशोक यांच्या जबाबाचे अवलोकन केले असता, फिर्यादप्रमाणे दिनांक १९/०१/२०१४ रोजी त्यांनी रू. दोन लाख हिरामण याच्या हातामध्ये दिले व तेथे हिरामण, संदिप ज्ञानेश्वर हे हजर होते. तसेच फिर्यादीने संतोष याच्या खात्यावर रू. दोन लाख जमा केल्याची पावती दोषारोपपत्रात दाखल आहे. सदरचा गुन्हा हा समान उद्य ेशाने केला आहे. आरोपी क्र. ३ याच्याकडुन इतर आरोपींची ओळख फिर्यादीला झाली. आरोपी क्र. ३ याने नोकरीसाठी फिर्यादी व त्याच्या भावाला पैशांची मागणी केली. त्यामुळे आरोपी क्र. ३ चा प्रथमदेर्शनी सहभाग गुन्हयामध्ये दिसुन येतो.

०६. भा.दं.वि.कलम ४२० हा गुन्हा शाबीत करण्यासाठी सुरूवातीपासुन साक्षीदाराची फसवणुक होणे गरजेचे आहे. फिर्यादीच्या भावाने पहिल्यांदा आरोपी हिरामण याला फोन केला. त्यावेळी त्याने नोकरीसाठी रू.

चार ते पाच लाख लागतील असे सांगितले. आरोपी क्र. ३ हा जालना येथील वखारीमध्ये कामाला नाही. त्यामुळे फिर्यादीची सुरूवातीपासुन फसवणुक झाली हे प्रथमदेर्शनी दिसुन येते. आरोपीचे वि. वकीलांच्या युक्तिवादानुसार फिर्यादी व इतर साक्षीदारांनी आरोपींना जी कायदेशीर नोटीस पाठविली, त्यामध्ये आरोपी क्र. ३ चा कोणताही सहभाग नाही असे स्पष्टपणे म्हटल्याचे दिसुन येत आहे. सदर नोटीसचे अवलोकन केले असता, आरोपी क्र. ३ हिरामण ढवळु बागुल यांना नोटीस पाठविल्याचे दिसुन येत नाही. फौ.प्र.सं. कलम १७३ अन्वये दाखल केलेला अहवालामधील फेरीस्तचे अवलोकन केले असता, सदरची नोटीस ही तपासाधिकारी यांनी अहवालासोबत दिली नाही असे स्पष्ट दिसुन येते. त्यामुळे ना. सर्वोच्च न्यायालय व ना. उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयानुसार फौ.प्र.सं.कलम १७३ अन्वये दाखल केलेला अहवाल व त्यासोबतचे कागदपत्रे, या व्यतिरिक्त इतर कोणतेही कागदपत्रे दोषारोप निश्चित करण्याइतका पुरावा आहे किंवा नाही यासाठी विचारात घ ेता येणार नाही. सदरची नोटीस ही तपासाधिकारी यांनी दाखल केलेली नाही. त्यामुळे कलम २३९ अन्वये आरोपीला विनादोषारोप सोडण्यासाठी विचारात घ ेता येणार नाही. वरील कारणमीमांसावरून प्रथमदेर्शनी आरोपी विरूध्द दोषारोप मांडण्याइतका पुरावा आहे हे स्पष्ट दिसुन येते. त्यामुळे सदरचा अर्ज हा रद्द होण्यांस लायक आहे.

सही/—

( डि.एम.गित्ते )
न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग,
कळवण.

दिनांक :— २८/१०/२०२१
ठिकाण :— कळवण.